क्र.पोमसं/३/१०/६/सार्वत्रिक बदल्या-२०२२/३६/२०२२
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
शहीद भगत सिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१
दिनांक:- १० /०३/२०२२.

**संदर्भ:-** १) सन-२०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दि.२५/०६/२०१४ व,
२) सन-२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दि. ०६/०४/२०१५.

**विषय:-** नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०२२ करीता माहिती पाठविणेबाबत.

-----०-----

**परिपत्रक :-**

उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या सन-२०१५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.११, दि.०६/०४/२०१५ मधील मुख्य अधिनियमाचा [महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१] कलम-२२ न मधील पोटकलम (१) मधील (एक) (क) नुसार नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक यांचा सामान्य पदावधी हा पोलीस ठाणे किंवा शाखा येथे ०२ वर्षे, एखाद्या जिल्ह्यात ०४ वर्षे आणि परिक्षेत्रात ०८ वर्षे इतका असेल. तथापि जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखा व विशेष शाखा आणि आयुक्तालयातील गुन्हे शाखा व विशेष शाखा यांच्याकरीता सामान्य पदावधी हा ०३ वर्षे निश्चित करण्यात आलेला आहे.

२. वरील नमूद महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम-२२ न मधील पोटकलम (१) (एक) (१) (ड) नुसार नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक यांचा सामान्य पदावधी हा इतर आयुक्तालयात ०६ वर्षे, आणि मुंबई आयुक्तालयात ०८ वर्षे इतका निश्चित करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे (इ) नुसार विशेषीकृत अभिकरणामधील सामान्य पदावधी हा ०३ वर्षे इतका निश्चित करण्यात आलेला आहे.

**३. सर्वसाधारण बदल्या-२०२२ ह्या खालील ०३ प्रकारात मोडतात:-**

**अ) विहीत कालावधी पूर्ण झालेले :-**

**i.** दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंत किंवा त्यापूर्वी ज्या नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांनी सध्या कार्यरत असलेल्या घटकांमध्ये विविध पदांवर (पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक) सलगपणे म्हणजे परिक्षेत्रात ०८ वर्षे, मुंबई आयुक्तालयात ०८ वर्षे व मुंबई व्यतिरीक्त इतर आयुक्तालयात ०६ वर्षे अशी सेवा / कर्तव्य बजावले आहे, असे बदलीपात्र नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक.

**ii.** ज्या नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांनी विशेषीकृत अभिकरण म्हणजेच फोर्स वन / युसीटीसी फोर्स वन / गुन्हे अन्वेषण विभाग, राज्य गुप्तवार्ता विभाग (महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी व विशेष सुरक्षा विभाग यांच्यासह), नागरी हक्क संरक्षण विभाग, ॲन्टी करप्शन ब्युरो, दहशतवाद विरोधी पथक, महामार्ग पोलीस, तसेच प्रशिक्षण संचालनालय (पोलीस प्रशिक्षण केंद्र / महाराष्ट्र पोलीस अकादमी / गुन्हे प्रकटीकरण केंद्र व अपारंपारिक अभियान व प्रशिक्षण केंद्र, नागपूर यांच्यासह) येथील विविध पदावर (पोउपनि / सपोनि / पोनि) **०३ वर्षांचा सलग कालावधी पूर्ण झालेला आहे, असे बदलीपात्र** नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक.

**iii.** दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंत किंवा त्यापूर्वी ज्या नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांचा कारागृह, पुणे / नक्षलवाद विरोधी अभियान, नागपूर / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, म.राज्य, मुंबई / पोलीस महासंचालक कार्यालय / आर्थिक गुन्हे शाखा, म.राज्य, मुंबई / सायबर व महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई / मा.राज्य मानवी हक्क आयोग / मा.अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती आयोग, मुंबई / बॉम्ब शोधक व नाशक पथके / अनुसूचीत जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या / विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या येथील विविध पदांवर (पोउपनि / सपोनि / पोनि) **०२ वर्षांचा सलग कालावधी पूर्ण झालेला आहे असे बदलीपात्र** नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक.

iv. दि.३१/०५/२०२२ पर्यंत किंवा त्यापूर्वी ज्या नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांचा शासन निर्णय, क्र.पीएमएन०१०९/प्र.क्र.८५२/पोल-५ब, दि.०८/१२/२००९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नक्षलग्रस्त भागातील अतिसंवेदनशील पोलीस ठाणे, पोलीस उप ठाणी व अॅडव्हान्सड् आऊटपोस्ट यामध्ये, त्यांचा गडचिरोली परिक्षेत्रात नक्षलग्रस्त भागातील (पोउपनि / सपोनि / पोनि) **अडीच वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे असे बदलीपात्र** नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक. तथापि ज्या पोलीस अधिकाऱ्यांची पदोन्नतीने पदस्थापना झालेली असेल त्यांना शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४ जुलै, २०२१ मधील तरतुदी लागू राहतील.

v. ज्या नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांनी दि.३१/०५/२०२२ पर्यंत किंवा त्यापूर्वी ते ज्या जिल्ह्यात कार्यरत आहेत, त्या जिल्ह्यात विविध पदावर (पोउपनि / सपोनि / पोनि) ०४ वर्षाचा सलग कालावधी पूर्ण केलेला असेल, परंतू परिक्षेत्रात त्यांनी ०८ वर्षे इतका सलग कालावधी पूर्ण केलेला नाही, अशा नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या परिक्षेत्रीय आस्थापना मंडळाने पोलीस महासंचालक कार्यालयाकडील सर्वसाधारण बदल्या-२०२२ चे आदेश निर्गमीत झाल्यानंतर बदल्या कराव्यात आणि त्यांचा अनुपालन अहवाल ह्या कार्यालयास पाठवावा

**ब) विहीत कालावधी पूर्ण नाही. परंतु, मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेली विनंती :-**

ज्या नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांनी त्यांच्या सध्याच्या पदावर विहीत कालावधी पूर्ण केलेला नाही. परंतु, त्या पदावरुन व ठिकाणावरुन इतर ठिकाणी बदली हवी असेल, अशा नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची **त्यांच्या विनंतीच्या ठिकाणासह व अशी बदली का पाहिजे याच्या सबळ कारणांसह कागदपत्रांची छाननी व सत्यता तपासून अभिप्रायासह त्वरेने माहिती पाठवावी. तसेच पदोन्नतीने पदस्थापना झालेल्या ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी संवर्ग बाह्य बदलीसाठी विनंती केली आहे, अशा पोलीस अधिकाऱ्यांच्या बाबतीत शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १४ जुलै, २०२१ मधील तरतुदींनुसार त्यांच्या कार्यरत महसुल विभागात पदोन्नतीवर ०१ वर्ष पुर्ण झाला असल्याची आणि सदर अधिसूचनेत नमुद वैद्यकीय कारणे व संबंधित कागदपत्रांची खात्री करुनच त्यांची माहिती या कार्यालयास पाठवावी.**

**क) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक :-**

ज्या नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची प्रतिकूल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत घटकप्रमुखांनी या कार्यालयाचे क्र.पोमसं/१४-अ/६७/एमएम/१८७/२०१६, दिनांक ०७/१०/२०१६ व क्र.पोमसं/१४-अ/६७ /एमएन /३२८/ २०१६, दि.०८/११/२०१७ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींचे पालन करुन त्यानुसार संबधीत नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या बदलीबाबत परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा.

४. **दिनांक १० /०३/२०२२ पूर्वी या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज या परिपत्रकान्वये रद्द समजण्यात येत आहेत.** त्यावर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी व ती बाब संबंधीत घटकप्रमुखांनी सर्व नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या लेखी स्वरूपात निदर्शनास आणून द्यावी.

५. महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ मधील कलम-२ (६A) नुसार नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या या दरवर्षी मे पर्यंत करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशाप्रकारे वर नमूद केल्याप्रमाणे पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांच्याकडून त्या कालावधीत करणे सुलभ होण्याच्या दृष्टीकानोतून, सर्व संबंधीत पोलीस घटकप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी परि.क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे **(१)** विहीत कालावधी पूर्ण झालेले नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक, **(२)** मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज तसेच, **(३)** प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाच्या नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची माहिती **स्वतंत्रपणे सोबत जोडलेल्या विवरणपत्रात (विवरणपत्र - अ, ब व क) सादर करावी.** यामध्ये कोणत्याही नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची माहिती पाठवावयाची राहून गेल्यास त्यास संबंधित घटक प्रमुख हे जबाबदार राहतील. तसेच, खाली नमूद

केलेल्या अंतिम तारखेनंतर म्हणजेच **दिनांक ३१/०३/२०२२** नंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची समज सर्व अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात देण्याची जबाबदारी संबंधित घटकप्रमुखांची आहे.

६. सदरची माहिती Word Sheet मध्ये DVBW-TTSurekh मध्ये टंकलिखित करुन, परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन, बिनचूक सेवातपशीलांची विवरणपत्रे ही प्रत्येकी एक याप्रमाणे नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची माहिती पेन ड्राईव्ह वर तसेच, हार्ड कॉपी मध्ये **दिनांक ३१/०३/२०२२ पूर्वी निश्चितपणे पाठवावी.** अन्य फॉन्टमध्ये प्राप्त झालेली माहिती ह्या कार्यालयातील संगणकावर उपलब्ध नसल्याने ती भरण्यासाठी अधिक कालावधी लागत असल्याने, अशी माहिती स्विकारणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

७. **उक्त** नमूद प्रमाणे नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस निरीक्षक यांची माहिती उक्त परिच्छेद ३ मधील नमूद बदलीच्या ०३ प्रकारांप्रमाणे स्वतंत्र याद्या तयार करुन खालील कार्यासनांत स्वतंत्र पत्रान्वये व स्वतंत्र लिफाफ्यात पाठवावी. तसेच, सदरची माहिती संबंधित कार्यासनात प्राप्त झाल्याबाबतची खात्री करण्याबाबतच्या सूचना संबंधीत लिपीक व टपाल ड्युटीवरील कर्मचाऱ्यांना द्याव्यात.

| **अ.क्र.** | **नि:शस्त्र पद** | **संबधीत कार्यासन क्रमांक** |
|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक | कार्यासन क्रमांक- ३ |
| २. | सहायक पोलीस निरीक्षक | कार्यासन क्रमांक- ४ |
| ३. | पोलीस उपनिरीक्षक | कार्यासन क्रमांक- ५ |

८. घटकांतर्गत / परिक्षेत्रांतर्गत सार्वत्रिक बदल्या पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांचे सार्वत्रिक बदली आदेशानंतर काढण्यात याव्यात.

१८/३/२०२२

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म. राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे / प्रशिक्षण व खास पथके, मुंबई / लोहमार्ग मुंबई / वाहतुक , मुंबई / आ.गु.शा., म.राज्य, मुंबई / द.वि.प., म. राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबई सह व बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / नक्षल विरोधी अभियान, नागपूर/ वि. सु. वि., दादर, मुंबई / फोर्स वन, मुंबई / मा.राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई / ना.ह.सं., म. राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
पोलीस उपनिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / विशेष सुरक्षा विभाग, दादर-मुंबई / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई सह)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये / युओटीसी, नागपूर / डी.टी.एस्., नाशिक.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीकरिता सस्नेह अग्रेषित.**

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, क्वीन्स गार्डन, पुणे.
महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा मुख्य समन्वयक, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या, म. राज्य, पुणे.
उपायुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे / नाशिक / नागपूर / ठाणे / औरंगाबाद / अमरावती / नंदुरबार / गडचिरोली.
उप संचालक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सोलापूर / कोल्हापूर / सांगली / सातारा / पुणे / ठाणे / रायगड / पालघर / रत्नागिरी / सिंधुदूर्ग / मुंबई शहर / मुंबई उपनगर / नाशिक / अहमदनगर / धुळे / जळगावं / नंदुरबार / औरंगाबाद / बीड / जालना / परभणी /

लातूर / नांदेड / हिंगोली / उस्मानाबाद / अमरावती / यवतमाळ / अकोला / बुलढाणा / वाशिम / क्र. १ व ३ नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर / गडचिरोली.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीकरिता सस्नेह अग्रेषित.**

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीस गार्डन, पुणे.

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा मुख्य समन्वयक, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. त्यांनी, त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत पोलीस अधिकाऱ्यांची माहिती संकलित करुन ती या कार्यालयास विहीत मुदतीमध्ये कृपया पाठवावी.

कार्यासन अधिकारी, का.क्र.४, ५, ३६ व ४०.

नमुना विवरणपत्र - अ (विहित कालावधी पूर्ण बदली)

नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक / नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०२२.

| अ. क्र. | १. संबंधित अधिकाऱ्याचे नांव<br>२. सध्याची नेमणूक<br>३. मूळ जिल्हा<br>४. सेवानिवृत्ती दिनांक | खात्यात हजर झाल्यापासून केलेली सेवा | | | खात्यात हजर झाल्यापासून अकार्यकारी पदावर केलेली सेवा | | | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी | | बदलीसाठी पसंतीची ३ ठिकाणे (प्राथम्य क्रमानुसार नमूद करावी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | घटक | पासून | पर्यंत | घटक | | | |
| | १. रविंद्र एकनाथ पवार | पोलीस उप निरीक्षक | | | पोलीस उप निरीक्षक | | | | | १.विनंतीचे ठिकाण :- |
| | | ०१/०६/१९८८ | १५/०८/१९९८ | मुंबई शहर | | | | २०१६-१७ | A | १. |
| | | ३०/०८/१९९१ | ०७/०२/१९९४ | वि.सु.वि | ३०/०८/१९९१ | ०७/०२/१९९४ | वि.सु.वि. | २०१७-१८ | A+ | २. |
| | २. सध्याची नेमणूक :- दि.२६/०५/२०११ पासून पालघर | १०/०२/१९९४ | १५/१२/१९९८ | पुणे शहर | | | | २०१८-१९ | B+ | ३. |
| | | ३१/१२/१९९८ | २५/०५/१९९९ | लोहमार्ग, मुंबई | | | | २०१९-२० | B+ | |
| | | सहायक पोलीस निरीक्षक | | | सहायक पोलीस निरीक्षक | | | २०२०-२१ | A | |
| | | ३०/०५/१९९९ | १२/०५/२००० | मुंबई शहर | | | | | | |
| | ३. मूळ जिल्हा :- सातारा | १५/०५/२००० | २०/०५/२००३ | कोल्हापूर | | | | | | |
| | ४. सेवानिवृत्ती दिनांक :- ३०/११/२०२६ | | | | | | | | | |
| | | पोलीस निरीक्षक | | | पोलीस निरीक्षक | | | | | |
| | | २१/०५/२००३ | १७/०९/२००४ | कोल्हापूर | | | | | | |
| | | २४/१०/२००४ | १०/०५/२००६ | मुंबई शहर | | | | | | |
| | | १५/०५/२००६ | २०/०५/२००७ | रा.गु.वि | १५/०५/२००६ | २०/०५/२००७ | रा.गु.वि. | | | |
| | | ३०/०५/२००७ | २५/०५/२०११ | पुणे शहर | | | | | | |
| | | २६/०५/२०११ | आजपर्यंत | पालघर | | | | | | |
| | | एकुण केलेली सेवा ३३ वर्षे ८ महिने | | | अकार्यकारी पदावरील एकुण सेवा ३ वर्षे ५ महिने | | | | | |

(घटकप्रमुखाचे नाव, पदनाम व स्वाक्षरी)

नमुना विवरणपत्र - ब (विनंती बदली)

नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक / नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०२२.

| अ. क्र. | १. संबंधित अधिकाऱ्याचे नांव<br>२. सध्याची नेमणूक<br>३. मूळ जिल्हा<br>४. सेवानिवृत्ती दिनांक | खात्यात हजर झाल्यापासून केलेली सेवा | | | खात्यात हजर झाल्यापासून अकार्यकारी पदावर केलेली सेवा | | | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी | | १.विनंतीचे ठिकाण<br>२. विनंतीचे थोडक्यात कारण<br>३. घटक प्रमुखाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | घटक | पासून | पर्यंत | घटक | | | |
| | १. रविंद्र एकनाथ पवार | पोलीस उप निरीक्षक | | | पोलीस उप निरीक्षक | | | | | १.विनंतीचे ठिकाण :- |
| | | ०१/०६/१९८८ | १५/०८/१९९८ | मुंबई शहर | | | | २०१६-१७ | A | |
| | | ३०/०८/१९९१ | ०७/०२/१९९४ | वि.सु.वि. | ३०/०८/१९९१ | ०७/०२/१९९४ | वि.सु.वि. | २०१७-१८ | A- | |
| | २. सध्याची नेमणूक :-<br>दि.२६/०५/२०११ पासून<br>पालघर | १०/०२/१९९४ | १५/१२/१९९८ | पुणे शहर | | | | २०१८-१९ | B- | |
| | | ३१/१२/१९९८ | २५/०५/१९९९ | लोहमार्ग, मुंबई | | | | २०१९-२० | B- | २. विनंतीचे थोडक्यात कारण :- |
| | | सहायक पोलीस निरीक्षक | | | सहायक पोलीस निरीक्षक | | | २०२०-२१ | A | |
| | | ३०/०५/१९९९ | १२/०५/२००० | मुंबई शहर | | | | | | |
| | ३. मूळ जिल्हा :- सातारा | १५/०५/२००० | २०/०५/२००३ | कोल्हापूर | | | | | | ३. घटक प्रमुखाचे अभिप्राय :- * |
| | | | | | | | | | | |
| | ४. सेवानिवृत्ती दिनांक :-<br>३०/११/२०२६ | | | | | | | | | |
| | | पोलीस निरीक्षक | | | पोलीस निरीक्षक | | | | | |
| | | २१/०५/२००३ | १७/०९/२००४ | कोल्हापूर | | | | | | |
| | | २४/१०/२००४ | १०/०५/२००६ | मुंबई शहर | | | | | | |
| | | १५/०५/२००६ | २०/०५/२००७ | रा.गु.वि. | १५/०५/२००६ | २०/०५/२००७ | रा.गु.वि. | | | |
| | | ३०/०५/२००७ | २५/०५/२०११ | पुणे शहर | | | | | | |
| | | २६/०५/२०११ | आजपर्यंत | पालघर | | | | | | |
| | | **एकुण केलेली सेवा ३३ वर्षे ८ महिने** | | | अकार्यकारी पदावरील **एकूण सेवा**<br>**३ वर्षे ५ महिने** | | | | | |

* घटक प्रमुखांनी विनंती अर्ज व सोबतची कागदपत्रे पडताळून, सत्यता तपासून आपले अभिप्राय सादर करावे. तसेच विनंती अर्ज व कागदपत्र सुध्दा विवरणपत्रासोबत सादर करावे.

(घटकप्रमुखाचे नाव, पदनाम व स्वाक्षरी)

नमुना विवरणपत्र - क (प्रतिकूल अहवालावरून बदली)

नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक / नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०२२.

| अ. क्र. | १. संबंधित अधिकाऱ्याचे नांव<br>२. सध्याची नेमणूक<br>३. मूळ जिल्हा<br>४. सेवानिवृत्ती दिनांक | खात्यात हजर झाल्यापासून केलेली सेवा | | | खात्यात हजर झाल्यापासून अकार्यकारी पदावर केलेली सेवा | | | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी | | थोडक्यात कसूरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | घटक | पासून | पर्यंत | घटक | | | |
| | १. रविंद्र एकनाथ पवार | पोलीस उप निरीक्षक | | | पोलीस उप निरीक्षक | | | | | |
| | | ०१/०६/१९८८ | १५/०८/१९९८ | मुंबई शहर | | | | २०१६-१७ | A | |
| | | ३०/०८/१९९१ | ०७/०२/१९९४ | वि.सु.वि. | ३०/०८/१९९१ | ०७/०२/१९९४ | वि.सु.वि. | २०१७-१८ | A+ | |
| | २. सध्याची नेमणूक :- दि.२६/०५/२०११ पासून पालघर | १०/०२/१९९४ | १५/१२/१९९८ | पुणे शहर | | | | २०१८-१९ | B+ | |
| | | ३१/१२/१९९८ | २५/०५/१९९९ | लोहमार्ग, मुंबई | | | | २०१९-२० | B+ | |
| | | सहायक पोलीस निरीक्षक | | | सहायक पोलीस निरीक्षक | | | २०२०-२१ | A | |
| | | ३०/०५/१९९९ | १२/०५/२००० | मुंबई शहर | | | | | | |
| | ३. मूळ जिल्हा :- सातारा | १५/०५/२००० | २०/०५/२००३ | कोल्हापूर | | | | | | |
| | ४. सेवानिवृत्ती दिनांक :- ३०/११/२०२६ | पोलीस निरीक्षक | | | पोलीस निरीक्षक | | | | | |
| | | २१/०५/२००३ | १७/०९/२००४ | कोल्हापूर | | | | | | |
| | | २४/१०/२००४ | १०/०५/२००६ | मुंबई शहर | | | | | | |
| | | १५/०५/२००६ | २०/०५/२००७ | रा.गु.वि. | १५/०५/२००६ | २०/०५/२००७ | रा.गु.वि. | | | |
| | | ३०/०५/२००७ | २५/०५/२०११ | पुणे शहर | | | | | | |
| | | २६/०५/२०११ | आजपर्यंत | पालघर | | | | | | |
| | | एकुण केलेली सेवा ३३ वर्षे ८ महिने | | | अकार्यकारी पदावरील एकूण सेवा ३ वर्षे ५ महिने | | | | | |

(घटकप्रमुखाचे नाव, पदनाम व स्वाक्षरी)